महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. मआ/टीजीओ/८५२८
दि.०४-०२-२०१७

# कार्यालयीन आदेश

विषयः महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २००३ व २००९ व २०१५ अंतर्गत आयटी/आयटीईएस मिळकतींची मिळकत कर आकारणीबाबत.

संदर्भः- १. मे. महाराष्ट्र शासन यांचे जा.क्र. आयटीपी-२०१३/(प्र.क्र.२६५)/उद्योग-२,दि. २५/८/२०१५ रोजीचा शासन निर्णय.
२. नगरविकास विभाग यांचे पत्र स्थाकंक२०१५/प्रक्र१२८ नवि ३२ दिनांक ३०.९.२०१५
३. मा.स्थायी समिति ठ.क्र.११९२,दि.६/९/२०१६.
४. मा.मुख्यसभा ठ.क्र.७०२,दि.२८/११/२०१६
५. मा.महापालिका आयुक्त ठ.क्र.६/६२२,दि.११/१/२०१७.

मे. महाराष्ट्र शासनाने सन २०१५ आयटी धोरण निश्चित केले आहे. त्याअनुषंगाने दि. १५/८/२०१४ पासून पुढे शासनाच्या सन २०१५ आयटी/आयटीईएस धोरणातील पान क्र ६ मधील मुद्दा क्र ३.२(अ) (५)मध्ये **"उद्योग संचालनालयाकडे नोंदणीकृत असलेल्या माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना संबंधीत अधिकार क्षेत्रात लागू असलेल्या निवासी दराच्या सममूल्य दराने मालमत्ता कर आकारण्यात येईल. सदरचा लाभ देण्याचा आवश्यक सल्ला शासनाच्या नगर विकास विभागाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येईल".** असे नमूद केले आहे. त्यानुसार पुणे शहरातील १.४.२०१० पूर्वीच्या निवासी दराने आकारणी केलेल्या आयटी मिळकतींची वार्षिक करपात्र रक्कम बिगरनिवासी दराने करावे अगर कसे? मार्गदर्शन होणेबाबत मे. शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. शासनाचे उप सचिव यांनी त्यांचे संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये **उद्योग संचालनालयाकडे नोंदणीकृत असलेल्या माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना लाभ देण्यासाठी संबंधित तरतूदी विचारात घेवून आवश्यक ती कार्यवाही करावी असे निर्देश दिले आहेत.**

माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २००३ व २००९ च २०१५ अंतर्गत आयटी/आयटीईएस मिळकतींची मिळकत कर आकारणी अंतर्गत येणाऱ्या मिळकतीवरील करात सूट देणेसाठी मा.स्थायी समितीने संदर्भ क्र. २ अन्वये व मा.मुख्यसभेने संदर्भ क्र. ३ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

१) दि.१/४/२०१० ते १४.८.२०१५ या कालावधीत व पुढे ज्या आयटी मिळकतींची बिगर निवासी दराने कर आकारणी केलेली आहे. अशा आयटी मिळकतींची बिगरनिवासी दराने केलेली करपात्र रक्कम दि.३१/३/२०१७ अखेर कायम ठेवून मा.मुख्यसभेने मान्यता दिलेल्या विविध कराच्या दराने मिळकतकराची वसूली करावी व अशा आय टी मिळकतीची वार्षिक करपात्र रक्कम दि.१/४/२०१७ पासून रू.३.६० प्रती चौ.फूट निवासी वाजवी भाड्याच्या दराने फेरनिश्चित करावी व याकरीता जिल्हा उद्योग केंद्राचे आय टी व आयटीईएस प्रमाणपत्र घेवून तसेच खात्याकडील पेठ निरीक्षक व विभागीय निरीक्षक यांचा तपासणी निरीक्षण अहवाल घेवून उप आयुक्त करआकारणी व करसंकलन प्रमुख यांनी पुढील कार्यवाही करावी व निश्चित केलेल्या करपात्र रकमेवर मा.मुख्यसभेने मान्यता दिलेल्या कराच्या दराने दि.१/४/२०१७ पासून आकारणी करावी व मिळकतकराची बीले पाठवावी. तथापि जर मिळकतीचा वापर आय टी ,आयटीईएस धोरणा व्यतिरिक्त इतर कारणाकरीता वापर असेल तर वापरानुसार बिगरनिवासी असल्यास वार्षिक करपात्र रकमेत बदल करण्यात येवू नये.

२) आयटी व आयटीईएस प्रमाणपत्र आहे अशा मिळकती की ज्यांना २०१५ च्या धोरणाप्रमाणे दि.१५/८/२०१५ नंतर भोगवटा पत्र प्राप्त झालेले असतील त्या मिळकतींची करआकारणी रू.३.६० प्रती चौ.फूट निवासी वाजवी भाड्याच्या दराने किंवा संबंधित विभागातील निवासी वाजवी भाड्याचा दर यापैकी जो दर अधिक असेल त्या दराने निश्चित करणेत यावी .

३) सन २०१७-१८ पासून पुढे ज्या ज्या आर्थिक वर्षात निवासी वाजवी भाड्याच्या प्रति चौ.फुटाच्या दरामध्ये जेवढी वाढ होईल त्याप्रमाणे आयटी मिळकतीच्या सद्याच्या (रु.३.६० प्रती चौ.फूट) दरामध्ये तेवढी वाढ करावी व त्यानुसार येणारा एकूण दर किंवा त्या त्या वर्षामध्ये आयटी मिळकतीची करआकारणी संबंधित विभागातील निवासी वाजवी भाड्याचा दर यापैकी जो दर अधिक असेल त्या दराने करपात्र रक्कम निश्चित करावी व याकरीता जिल्हा उद्योग केंद्राचे आय टी व आयटीईएस प्रमाणपत्र घेवून तसेच खात्याकडील पेठ निरीक्षक व विभागीय निरीक्षक यांचा तपासणी निरक्षण अहवाल घेवून उप आयुक्त करआकारणी व करसंकलन प्रमुख यानी करआकारणी निश्चित करणेबाबत कार्यवाही करुन मा.मुख्यसभेने दिलेल्या कराच्या दराने मिळकतकराचे देयके पाठवून मिळकतकराची वसूली करणेत यावी.

**(कुणाल कुमार)**
**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका.**

प्रत. १) मा.अति. महा.पालिका आयुक्त (ज), २) उप आयुक्त ,करआकारणी व करसंकलन प्रमुख , ३) सर्व प्रशासन अधिकारी, ४)सर्व विभागीय निरीक्षक, ५) संपर्क अधिकारी , ६) आकारणी विभाग प्रमुख, ७) संगणक विभाग प्रमुख कार्यालय अधिक्षक, ८) मुख्यलेखा परीक्षक, पुणे महानगरपालिका. यांजकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी..

IT police 2015